वर्ष : ०४ | अंक: ३५ | मुंबई, मंगळवार २४ जुलै २०१८ ते ३० जुलै २०१८ | पृष्ठ: ४

# पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये


POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 आरक्षणाची वेळ सुरू होण्याआधीच रेल्वे तिकीटांची विक्री!

3 → दुधात साखर!

आहाराची बिले थकली, वसतीगृह बंद? ← 4




## मराठा आरक्षण: 'मुख्यमंत्री खोटे बोलताहेत'



**विठ्ठलाचा काही दोष नाही, पूजा होऊन जाऊ द्या कुणाच्याही हातून. एवढे सगळे वारकरी जमले आहेत. सर्वांच्या श्रध्देला गालबोट लागता कामा नये. मात्र मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे खोटे बोलत आहेत असा आरोप मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी जालन्यात केला.**

'मराठा आरक्षणाच्या मुळाशी जायला कुणीच तयार नाही, सरकारच्या दोन ते तीन टक्के नोकरीमध्ये आरक्षण देऊन प्रश्न सुटणार आहे का? खाजगी क्षेत्राच्या आरक्षणासंदर्भा कुणी बोलत नाही. कोणाचं काय चाललंय याचा थांगपत्ता नाही. वस्तुस्थिती सांगायला कुणी तयार नाही. विधानसभेच्या अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेली घोषणा ही तोंड बंद करण्यासाठी केली आहे,' असे राज ठाकरे यांनी सांगितले.

नरेंद्र मोदी हे नेहमी सगळ्यांना इतक्या मिठ्या मारतात की राहुल गांधी यांनी त्यांना मारलेल्या मिठीत आपल्याला काही चूकचे वाटत नाही, शिवसेनेचा मात्र मोठा वैचारिक गोंधळ उडालेला आहे केंद्रात आणि राज्यात काय करावे हे त्यांना समजत नाही आणि त्यातूनच काल संसदेत तटस्थ राहण्यासारख्या घटना घडतात असे राज ठाकरे म्हणाले.

राजीव गांधी यांच्या नंतर पहिल्यांदा केंद्रात एक चांगले बहुमत नरेंद्र मोदी यांना मिळाले असताना ते काही चमत्कार घडवू शकले असते मात्र ते नोटाबंदी, योग, स्वच्छ भारत आणि जीएसटी या सगळ्यामध्ये अडकून पडले. जीएसटी आता हळूहळू कमी करताहेत, मूळ प्रश्नाला ते काही हात घालत नाहीत, असेही ठाकरे म्हणाले.

महाराष्ट्रात १ लाख २० हजार विहीरी बांधल्या ही मुख्यमंत्र्यांनी दिलेली माहिती खोटी आहे. महाराष्ट्र हागणदारीमुक्त झाला हे सगळे खरे नाही असेही ते म्हणाले.

### मराठा तरूण रस्त्यावर; आंदोलन चिघळले

मुंबई- गेल्या काही दिवसांपासून पंढरपुरात मराठा क्रांती मोर्चाने पुकारलेल्या आंदोलनाचे पडसाद आता राज्यभरात उमटत आहेत. पुणे, मुंबई आणि सोलापूरसह राज्यभरात मराठा तरुणांनी मोर्चा, ठिय्या आंदोलन करत राज्यसरकार विरोधात संताप व्यक्त केला आहे. या आंदोलकांनी राज्यभरातून पंढरपुरात येणाऱ्या एकूण १६ बसेस फोडल्याने पंढरपुरात मोठा पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.



## सेव्हन इलेव्हन रुग्णालयाची जागा अखेर महापालिकेकडे

### जिद्दी मराठा संघटनेचे अध्यक्ष प्रदिप जंगम यांच्या अथक प्रयत्नांमुळे सामान्य नागरिकाला त्याचा अधिकार मिळाला




**भाईंदर- भारतीय जनता पक्षाचे आमदार नरेंद्र मेहता यांच्या निकटवर्तीयांच्या सेव्हन इलेव्हन रुग्णालयातील महापालिकेला देय असलेली जागा अखेर महापालिकेकडे हस्तांतर झाली आहे. या जागेच्या कराराची नोंदणी नुकतीच करण्यात आली असल्याची माहिती आयुक्त बालाजी खतगावकर यांनी दिली. ही जागा महापालिकेकडे हस्तांतर करण्यास गेली अनेक वर्षे टाळाटाळ करण्यात येत होती.**

महापालिकेच्या विकास आराखड्यात आरक्षण क्रमांक २१७ हा दवाखाना आणि प्रसूतिगृह यासाठी राखीव जागा आहे. मात्र आमदार नरेंद्र मेहता यांच्या निकटवर्तीयांच्या सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन कंपनीने या ठिकाणी रुग्णालयाची निर्मिती केली. हे आरक्षण स्वत: जमीनमालकाने विकसित केले असल्याने विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार आणि विकासकाला देण्यात आलेल्या बांधकाम परवानगीतील अटी शर्तीनुसार रुग्णालयाच्या एकंदर क्षेत्रफळापैकी ४३३ चौ.मी.

उर्वरित पृष्ठ 4 वर

## देखभालीस जबाबदार कोण?

### मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग खड्डयात



**मुंबई- मुंबई-गोवा महामार्गाच्या देखभालीसाठी कोण जबाबदार आहे, असा प्रश्न करत, उच्च न्यायालयाने राज्य सरकारला स्पष्टीकरण देण्याचे निर्देश शुक्रवारी दिले. मुंबई-गोवा महामार्गाबरोबर त्यावर पडलेले खड्डे दुरुस्त करण्यासाठी काय पावले उचलली आहेत ते सांगा, नाहीतर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला करायला सांगा, असे न्या. अभय ओक व न्या. रियाझ छागला यांनी राज्य सरकारला सांगितले.**

व्यवसायाने वकील असलेले ओवेस पेचकर यांनी याबाबत उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. मुंबई -गोवा या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम २०१० पासून कासवगतीने सुरू आहे. या महामार्गावर अनेक खड्डे पडले आहेत. मात्र, याची दखल सरकारने घेतलेली नाही. हा महामार्ग मृत्यूचा सापळा ठरत आहे. सप्टेंबरमध्ये गणेशोत्सव असल्याने, त्या निमित्ताने कोकणात जाणाऱ्यांची संख्या वाढेल. मात्र, या रस्त्यावर खड्डे असल्याने वाहतूककोंडी होईल व अपघातही होऊ शकतो. त्यामुळे या महामार्गाची व खड्ड्यांची दुरुस्ती करण्याचे आदेश सरकारला द्यावेत, अशी विनंती पेचकर यांनी न्यायालयाला केली आहे. या याचिकेवरील सुनावणी न्या. अभय ओक व न्या. रियाझ छागला यांच्या खंडपीठापुढे होती.

हा महामार्ग इतका व्यस्त असूनही त्यावर इतके खड्डे कसे?असे म्हणत न्यायालयाने या महामार्गाच्या देखभालीस जबाबदार कोण आहे, याची माहिती सोमवारपर्यंत देण्याचे निर्देश राज्य सरकारला दिले. 'राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) जबाबदार असेल, तर त्यांना नोटीस बजावू. त्याशिवाय या प्राधिकरणाने महामार्ग व खड्डे दुरुस्तीचे काम वेळेत करावे, याची खात्री करण्यासाठी तुम्ही (राज्य सरकार) काय केलेत, तेही आम्हाला सांगा. जर महामार्गाच्या देखभालीचे काम करण्यास तुम्ही जबाबदार असाल, तर महामार्ग आणि खड्डे दुरुस्तीसाठी काय पावले उचलली आहेत? याची माहिती द्या,' असे निर्देश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले.

### सौजन्य व्हॉट्सअप




## जाधव दाम्पत्याला शासकीय पूजेचा मान, मुख्यमंत्र्यांची 'वर्षा'वर विठूपूजा

**पंढरपूर- पंढरपुरात पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास विठूरायाची शासकीय महापूजा पार पडली. मुख्यमंत्र्यांच्या अनुपस्थितीत यंदा पूजेचा मान हिंगोलीच्या जाधव दाम्पत्याला मिळाला. अनिल जाधव आणि वर्षा जाधव यांनी विठ्ठल आणि रुक्मिणीची महापूजा केली. जाधव दाम्पत्य हे शेणगाव तालुक्यातील भगवती गावचे रहिवासी आहेत.**



शेतकऱ्याच्या मालाला हमीभाव मिळावा अशी मागणी विठ्ठलाकडे केल्याचं यावेळी जाधव दाम्पत्यानं सांगितलं.महापूजेवेळी जलसंपदामंत्री गिरिश महाजन, परिवहनमंत्री दिवाकर रावते, दुग्धविकास मंत्री महादेव जानकर यांच्यासह शिवसेनेचे खासदार अनिल देसाई उपस्थित होते.दरम्यान, पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराला आषाढी एकादशीच्या निमित्ताने खास रोषणाई करण्यात आली होती. या दिव्यांच्या रोषणाईने परिसर अक्षरश: उजळून निघाला होता.पंढरपुरात विठ्ठलाची महापूजा सुरु असतानाच इकडे मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा या शासकीय निवासस्थानी विठ्ठलाची सपत्नीक पूजा केली. मराठा आरक्षणाच्या मागणीवरुन काही आंदोलकांनी मुख्यमंत्र्यांना पंढरपुरात येण्यास विरोध केला होता.

## अमित शहांकडून भाजप कार्यकर्त्यांना स्वबळाचे आदेश

**मुंबई - स्वबळावर लढण्याच्या तयारीला लागा. सत्तेत असल्यानं भ्रमात राहू नका, असे आदेश भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय**



**अध्यक्ष अमित शाह यांनी पक्ष कार्यकर्त्यांना मुंबईत दिले. अमित शाह मुंबईच्या दौऱ्यावर रविवारी आले होते. त्यावेळी त्यांनी पक्ष कार्यकर्त्यांशी संवाद साधला.**

दरम्यान, पक्ष कार्यर्त्यासोबत संवाद साधताना त्यांनी निवडणुकीसाठी कामाला लागण्याचे आदेश दिलेत. 'एक बूथ २५ यूथ' अशा पद्धतीची रचना करा, सरकारच्या योजना जनतेपर्यंत पोहोचवा, सत्तेत आहोत, म्हणून आपली सगळी कामं होतील, या भ्रमात राहू नका अशा सूचना अमित शाह यांनी भाजप कार्यकर्त्यांना दिल्या. मुंबईमध्ये अमित शाह यांनी संपर्क फॉर समर्थन या मोहिमेअंतर्गत भारतरत्न लता मंगेशकर यांची भेट घेतली. त्याचबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह नितीन गडकरी, पियूष गोयल आणि गोव्याचे मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पदाधिकाऱ्यांशीही अमित शाहांची मुंबईत चर्चा झाली.

# ऑनलाइनमार्गात 'विघ्न'च

**मुंबई-** उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रोत्सवाच्या मंडपउभारणीसाठी महापालिकेतर्फे ऑनलाइन अर्ज सुविधा सुरू करण्यात आली आहे. मात्र या ऑनलाइन परवानगी प्रक्रियेत अनेक तांत्रिक अडचणी असल्याचे मंडळांचे म्हणणे आहे. परवानगी अर्ज ऑनलाइन भरल्यानंतर पुढील परवानगीसाठी प्रत्यक्ष वॉर्ड ऑफिसमध्ये जाण्याची मंडळाच्या कार्यकर्त्यांना गरज भासत असल्याने नाराजीचा सूर उमटत आहे.



गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवासाठी सार्वजनिक जागी मंडप, प्रवेशद्वार उभारण्यासाठी पालिकेची पूर्वपरवानगी बंधनकारक आहे. पूर्वी यासाठी पालिकेच्या संबंधित विभाग कार्यालयात स्वतः जाऊन अर्ज द्यावा लागत असे. तसेच अर्ज सादर करताना मुंबई पोलिस व वाहतूक पोलिसांचे ना-हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागत असे. नागरिकांच्या सुलभतेसाठी 'इज ऑफ डुइंग बिझनेस' अंतर्गत पालिकेने ही सर्व प्रक्रिया पालिकेच्या portal.mcgm.gov.in (www.mcgm.gov.in) या संकेतस्थळावर ऑनलाइन उपलब्ध केल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र पालिकेच्या संकेतस्थळावर असलेला मंडप परवानगी अर्ज लवकर डाऊनलोड होत नाही. तसेच तो ऑनलाइन भरताना मुख्य साइटशी संपर्क तुटत असल्याने खूप वेळ लागतो, असे काही मंडळांनी सांगितले. 'ट्राय अगेन'सारखा संदेश सध्या साइटवर येत आहे. यात काही मंडळांकडे स्वतःची संगणकसुविधा नाही. त्यामुळे त्यांना तर फॉर्म कसा भरायचा असाही प्रश्न पडला आहे. हा अर्ज भरताना गेल्यावर्षीचे पोलिस परवानगीचे पत्र स्कॅन करून अपलोड करायचे आहे. यात परवानगी क्रमांक द्यायचा आहे. मात्र गेल्या वेळी फक्त जावक क्रमांक दिले होते. त्यामुळे हा परवानगी क्रमांक कसा भरायचा असा प्रतिनिधिक प्रश्न नवदुर्गा मित्रमंडळाचे संजय शिर्के यांनी उपस्थित केला आहे. हा अर्ज भरून झाल्यानंतर तो प्रभाग कार्यालयामध्ये जाऊन द्यायचा आहे. त्यानंतर प्रत्यक्ष परवानगीसाठी, पैसे भरण्यासाठी प्रभाग कार्यालयामध्ये जावेच लागणार आहे. त्यामुळे ही पद्धत पूर्ण ऑनलाइन नाही अशीही काही मंडळांची तक्रार आहे

# बिल्डरांवरील कारवाईसाठी १३ नियमांचा अडथळा?

**वसई– अनधिकृत बांधकामे करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांना गुन्हे दाखल करण्यासाठी पोलिसांनी दिलेल्या १३ नियमांचे पालन करणे अडचणीचे ठरत असून त्याचा फायदा विकासकांना मिळत आहे, असा आरोप पालिका अधिकाऱ्यांनी केला आहे. '१३ नियमांमुळे आम्ही तक्रार दिल्यावरही दोन महिने गुन्हे दाखल होत नाही आणि बिल्डर न्यायालयातून अटकपूर्व जामीन मिळवतो,' असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. पोलीस अधीक्षकांनी हे आरोप फेटाळले आहेत. उलट या १३ कलमांमुळे बिल्डरांवर पुराव्यानिशी गुन्हे दाखल होतात आणि त्या सर्वांना न्यायालयात शिक्षा होईल, असे अधीक्षकांनी सांगितले.**



वसई-विरार शहरात अनधिकृत बांधकामांचे पेव फुटले आहे. अनेक लहान मोठे विकासक, बांधकाम व्यावसायिक अनधिकृत इमारतींचे बांधकाम करीत आहेत. अनेक जण बनावट कागदपत्रांच्या आधारे बहुजमली इमारती बांधत आहेत. अशा इमारती बांधणाऱ्या विकासकांवर महापालिकेच्या तक्रारींनंतर पोलीस ठाण्यात फसवणुकीचे गुन्हे दाखल होत असतात. मात्र असे गुन्हे दाखल करण्यापूर्वी १३ बाबींची पूर्तता करावी आणि तरच गुन्हे दाखल होतील, असे पत्र पालघरचे पोलीस अधीक्षक मंजुनाथ सिंगे यांनी काढले होते. मात्र त्याची पूर्तता करण्यासाठी विलंब लागत असल्याचे महापालिकेचे अधिकारी सांगतात. मुळातच पोलिसांनी दिलेल्या अटींमध्ये विरोधाभास आहे. बांधकाम परवानगी मिळवण्यासाठी केलेला अर्ज जोडावा, अशी अट आहे.

ज्याने बांधकामच अनधिकृत केले आहे, तो परवानगीसाठी कसा अर्ज करेल, असे एका प्रभारी साहाय्यक आयुक्ताने सांगितले. आरोपी बिल्डरचा संपूर्ण पत्ता आणि त्याबाबतची माहिती आम्हीच शोधून द्यायची, मग पोलिसांनी काय करायचे, असा सवाल त्यांनी केला. आम्ही गुन्हे दाखल करावेत, असा अहवाल पोलिसांना देतो. परंतु त्यावर दोन ते तीन महिने काहीच कारवाई होत नाही. या काळात जो आरोपी विकासक बिल्डर असतो, तो न्यायालयातून अटकपूर्व जामीन मिळवतो. त्याला वेळ मिळतो, असे पालिकेच्या प्रभाग समिती 'क'चे प्रभारी साहाय्यक आयुक्त सुभाष जाधव यांनी सांगितले. मी माझ्या प्रभागात २० हून अधिक जणांवर गुन्हे दाखल करण्यासाठी फायली पाठविलेल्या आहेत. अद्याप त्या संबंधित बिल्डरांवर गुन्हे दाखल झाले नसल्याचे त्यांनी सांगितले.

पालघरचे पोलीस अधीक्षक मंजुनाथ सिंगे यांनी हे आरोप फेटाळले आहेत. पूर्वी महापालिकेचे अधिकारी केवळ एक अर्ज देऊन गुन्हा दाखल करा, असे सांगायचे. मात्र संबंधित प्रकरणाचे कागदपत्रे देत नव्हते. त्यामुळे त्रुटी राहत होत्या, असे सिंगे यांनी सांगितले.

न्यायालयात गुन्हा सिद्ध करण्यासाठी आवश्यक पुरावे लागतात. त्यामुळे आम्ही पालिकेला कोणती कागदपत्रे हवी आहेत, त्याची यादी दिलेली आहे. पालिकेने तक्रारी दिलेल्या सर्वच बिल्डरांवर गुन्हे दाखल झाले आहेत. अशा प्रकारे संपूर्ण कागदपत्रे आल्याने गुन्हे दाखल झालेल्या सर्वच्या सर्व बिल्डरांवर न्यायालयात गुन्हा सिद्ध होऊन शिक्षा होईल, असाही दावा त्यांनी केला. विलंब लागत असल्याचा आरोपात तथ्य नाही. महापालिकेने सर्व कागदपत्रे दिली की तपासणी करून लगेच गुन्हे दाखल होतात, असाही दावा त्यांनी केला.

# आरक्षणाची वेळ सुरू होण्याआधीच रेल्वे तिकीटांची विक्री!

**मुंबई-** ई-तिकिटांचे आरक्षण सुरू होताच प्रवाशांकडून अवघ्या काही सेकंदात मोठ्या प्रमाणात तिकिटे आरक्षित केली जातात. शुक्रवारी मात्र रेल्वेच्या तांत्रिक चुकीमुळे एका गणपती विशेष गाडीची काही ई-तिकिटे आरक्षणाच्या नियोजित वेळेआधीच आरक्षित झाल्याचा अजब प्रकार समोर आला. सुमारे ५० मिनिटे आधीच आरक्षणाची संधी उपलब्ध होताच जवळपास १३५ तिकिटे आरक्षित झाली. यामुळे गोंधळ होताच यंत्रणेत चुकीची तारीख आणि वेळ नोंदवली गेल्याने हा प्रकार झाल्याचे मध्य रेल्वेकडून स्पष्ट करण्यात आले.

मध्य आणि पश्चिम रेल्वेकडून गणपती विशेष गाड्या सोडण्यात आल्या आहेत. सप्टेंबर महिन्यातील काही गाड्यांचे आरक्षण हे २० जुलैपासून सुरू झाले आहे. यात पश्चिम रेल्वेवरील सहा आणि मध्य रेल्वेवरील तीन गाड्यांचा समावेश आहे. नियमानुसार नऊ गाड्यांचे आरक्षण सकाळी आठ वाजता सुरू होणे अपेक्षित होते. मात्र यातील ट्रेन ०९००७ मुंबई सेन्ट्रल ते बिकानेर जंक्शन विशेष गाडीचे तिकीट आरक्षण सकाळी ७.१० वाजता सुरू झाले. आरक्षण सुरू होताच सकाळी आठ वाजेपर्यंत १३५ तिकिटे आरक्षित झाली. ही बाब समोर येताच मध्य रेल्वे प्रशासनाचे धाबेच दणाणले. मुळात ज्या गाड्यांचे आरक्षण आधीच सुरू झालेले असते, अशा गाड्यांचे आरक्षण २१ तास प्रवाशांसाठी उपलब्ध असते. तर ज्या गाड्या त्या तारखेपासून आरक्षणासाठी उपलब्ध होणार आहेत, त्यांचे आरक्षण हे सकाळी आठ वाजताच सुरू होते. मात्र शुक्रवारी मुंबई सेन्ट्रल ते बिकानेर जंक्शन विशेष गाडीचे आरक्षण आधीच उपलब्ध झाले. त्यामुळे प्रवाशांनी ८ सप्टेंबर रोजीची १३ तिकिटे, १० सप्टेंबरची ११९ आणि १५ सप्टेंबरची तीन तिकिटे आरक्षित केली होती. ही पश्चिम रेल्वेवरून धावणारी आहे.



# खग्रास चंद्रग्रहण आषाढ शु. १५

दिनांक:-२७ -२८ जुलै २०१८

ग्रहण पूर्व:-०३ तास ५५ मिनिटे

ग्रहण स्पर्श २७ तारीख रात्री ११:५४ वाजता

गृहण सम्मिलन २८ तारीख रात्री ०१:००वाजता

उन्मूलन रात्री २ ४४ वाजता

मोक्ष रात्रि ०३:४९ वाजता

हे ग्रहण भारतात सर्वत्र खग्रास दिसणार आहे

**वेधारंभः** हे ग्रहण सुरू होण्याच्या तीन प्रहर आधी म्हणजे दुपारी १२:४५ पासून ग्रहण मोक्षपर्यंत वेध पाळावे

आजारी, अशक्त व्यक्ती व गर्भवती स्त्रिया यांनी सायंकाळी ५:३० पासून वेध पाळावेत.

टीप:- वेद काळात भोजन अन्नपदार्थ खाऊ नये.

**ग्रहण दिसणारा प्रदेशः-** भारतासह संपूर्ण आशिया खंड, युरोप, अफ्रिका खंड, दक्षिण अमेरिका, रशिया, ऑस्ट्रेलिया, न्युझीलँड, पॅसिफिक महासागर, हिंदी महासागर, अटलांटिक महासागर

**ग्रहणातील कृत्यः** ग्रहण स्पर्श होताच स्नान करावे. पर्वकालात देवपूजा, तर्पण, श्राद्ध ,जप, होम, दान करावेत

ग्रहणकाळामध्ये पर्वकाळात झोप, मूलमुत्रोत्सर्जन अभ्यंग, खाणे-पिणे व कामाविषयसेवन ही कामे करू नये.

ग्रहण मोक्षा नंतर स्नान करावे.

ग्रहणाचे राशीवर होणारी फल:-मेष, सिंह, वृश्चिक, मीन या राशींना शुभफल आहे.

वृषभ, कर्क, कन्या, धनु या राशींना मिश्र फळ आहे.

मिथुन, तुला, मकर, कुंभ या राशींना अशुभ फल आहे.

जर राशींना अशुभ फल आहे त्यांनी व गर्भवती स्त्रियांनी ग्रहण पाहू नये.

**संकलन- दाते पंचांग**

श्री. वे. स्वप्निल विजय जोशी गुरुजी नवनाथ भक्त

संपर्क:-९९२१२९८४१४, ८१४९३०३१०४ श्री स्वामी समर्थ ज्योतिष सेवा कार्यालय नाशिक रोड दुर्गा उद्यान दुर्गा देवी मंदिर

# मुंबईचे गुजरात करण्याचा सरकारचा डावः भुजबळ



**मुंबई-** मुंबईचे गुजरात करण्याचा डाव सरकार आखत असल्याची जोरदार टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी केली आहे. चेंबूरमधील नालंदा सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला संबोधित करताना भुजबळ यांनी भाजप सरकारवर घणाघाती टीका केली.

आरक्षण संपवणे हा सरकाचा डाव आहे असे वक्तव्य करत राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांनी सरकावर निशाणा साधला. हा डाव यशस्वी होऊ देऊ नका असेही आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले. मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसचे मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले आहे त्यावेळी त्यांनी हा आरोप केला. यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना कुणालाही न घाबरण्याचा सल्लाही दिला. लोकांच्या मदतीसाठी उभे राहा, स्वतःला झोकून द्या असेही त्यांनी कार्यकर्त्यांना सांगितले. अनेक आंदोलनांमध्ये मलाही अटक झाली पण मी डगमगलो नाही असेही त्यांनी स्पष्ट केले.

लोकांसाठी झोकून कसे द्यायचे असते या संदर्भात त्यांनी स्वतःचा एक किस्सा सांगितला. नगरसेवक म्हणून पहिल्यांदाच निवडून आलो. ई वॉर्ड मधून म्हणजेच भायखळ्यातून निवडून आलो होते तिथे एक मातीचा ढिगारा होता. तो स्वच्छ करण्यासाठी वारंवार महापालिकेकडे पत्र व्यवहार केला. मात्र मातीचा ढिगारा तसाच होता. शेवटी दोन महिने वाट पाहून सगळी माती टेंपोत भरली तो टेंपो महापालिकेजवळ घेऊन गेलो. महापालिकेच्या वॉर्ड ऑफिसरच्या टेबलवर घमेले भरून माती टाकली. वॉर्ड ऑफिसर म्हणू लागले हे काय करता? तर मी त्यांना उत्तर दिले की मातीचा ढिगारा स्वच्छ करा म्हणून दोन महिने पत्र व्यवहार करतो आहे. मात्र तुमच्याकडे वेळ नाही म्हणून तो ढिगाराच इथे आणू टाकला, ही आठवण त्यांनी सांगितली. तसेच त्यानंतर ई वॉर्ड स्वच्छ कसा झाला आणि लोकांनी माझा जयजयकार कसा केला हेदेखील भुजबळ यांनी सांगितले. दर वेळी कायदा हातात घेतला पाहिजे असे नाही. मात्र 'घी सिधी उँगलीसे नहीं निकले तो उँगली टेढी करनी चाहिये' हे सूत्र लक्षात ठेवा असेही त्यांनी कार्यकर्त्यांना सांगितले.

# मोनो ऑगस्टमध्ये रूळावर

**मुंबई–** गेल्या आठ महिन्यापासून कारशेडमध्येच विश्रांती घेत असलेली मोनो रेल्वे पुन्हा धावणार आहे. ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यानंतर मोनो रेल्वेचा बंद असलेला चेंबूर ते वडाळा हा पहिला टप्पा कार्यान्वित




करण्याच्या 'मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा'चा विचार आहे. मात्र या प्रवासासाठी प्रवाशांना आता अधिकचे पैसे मोजावे लागणार आहेत. कारण मार्गिका सुरू करण्याबरोबरच 'एमएमआरडीए'ने भाडेवाढ देखील केली आहे. तसेच पहिला टप्पा कार्यान्वित होत असला तरी अपुऱ्या मोनो गाड्यांमुळे वडाळा ते संत गाडगे महाराज चौक (सातरस्ता) हा दुसरा टप्पा इतक्यात सुरू होणार नाही.

विविध अडचणींचा सामना करत असलेल्या भारतातील पहिल्या मोनो प्रकल्पाला पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी एकीकडे 'एमएमआरडीए' प्रशासनाने 'मुंबई रेल्वे विकास महामंडळा'ला (एमआरव्हीसी) साकडे घातले आहे. तर दुसरीकडे ज्या कंपनीसोबत वाद सुरू आहेत. अशा 'स्कोमी' या मलेशियन कंपनीच्या गळी पडून बंद पडलेला मोनोचा पहिला टप्पा पुन्हा सुरू करण्याच्या तयारीत एमएमआरडीए आहे. चेंबूर ते वडाळा हा मोनोचा पहिला टप्पा लवकरच पुन्हा कार्यान्वित होणार असून कित्येक दिवस ही संपूर्ण मार्गिका बंद आहे. त्यामुळे या मार्गावर मोनोची 'ट्रायल रन' करणार असल्याची माहिती 'एमएमआरडीए'चे अतिरिक्त महानगर आयुक्त संजय खंदारे यांनी दिली.

## संपाने ४ हजार कोटींचा फटका

**मुंबई-** राज्यातील दूध आंदोलन संपुष्टात आल्याचा आनंद शुक्रवार पहाटेपासून सुरू झालेल्या देशव्यापी मालवाहतूक संपाने क्षणभंगूर ठरवला. मालवाहतूकदार, खासगी बस, शालेय बस आर्दीनी एकत्रित येत पुकारलेला देशव्यापी संप १०० टक्के यशस्वी ठरल्याचा दावा संघटनेने केला आहे. बेमुदत संपाने पहिल्याच दिवशी सुमारे चार हजार कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा आकडा सांगण्यात येतो. महाराष्ट्राचा विचार करता तोट्याची रक्कम सुमारे ६४० कोटी रुपयांवर पोहोचली आहे. हा संप न मिटल्यास त्याची तीव्रता एक ते दोन दिवसांत जाणवेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. केंद्र सरकारचे धोरण, डिझेलच्या दरांमधील वाढीसह अन्य प्रश्नांसाठी मालवाहतूकदारांनी एकत्रित येत देशव्यापी बेमुदत संपाची शुक्रवारपासून घोषणा केली. ऑल इंडिया मोटर ट्रान्सपोर्ट काँग्रेसने पुकारलेल्या संपास अन्य संघटनांनीही सक्रिय पाठिंबा दिल्याने रस्त्यांवरील अवजड वाहने, बस आर्दीची वाहतूक जवळपास थंडावली होती.

# माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन



*माहिती अधिकार कायद्याच्या कलम चारमध्ये प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाला कायद्याच्या अंमलबजावणीपासून १२० दिवसांत आपली सर्व माहिती प्रकाशित करण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये सर्व सरकारी कार्यालये, सरकारी बँका, निमसरकारी संस्था, सरकारच्या सहाय्याने कार्य करीत असलेल्या सहकारी संस्था, नाबार्डसारख्या संस्था, सरकार नियंत्रित म्हाडासारखी महामंडळे, वीज वितरण संस्था, पंचायत समित्या ते जिल्हा परिषदेतील सर्व कार्यालये अशा सर्वांचा समावेश आहे. राष्ट्रीयीकृत बँकांद्वारे शेतकऱ्यांना किती कर्जमाफी दिली याची माहिती का गुप्त ठेवण्यात येत आहे. माहिती दडपून टाकणे अगर देण्यास नकार देणे हे माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन आहे.*

इंडियन बँक असोसिएशन या बँकांच्या प्रातिनिधिक संघटनेने डीएसके प्रकरणात बँक ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष मराठे यांच्या विरोधातील फौजदारी कारवाईचा निषेध केला आहे आणि केंद्रीय अर्थ मंत्रालयात आणि महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांच्याशी संपर्क साधून या प्रकरणाचा पाठपुरावा करण्याचा निर्णय केला आहे. तथापि, या घटनेला दुहेरी अर्थ आहे. एक म्हणजे काही राजनैतिक रणनीती यामागे असण्याची शक्यता आहे आणि दुसरे म्हणजे आज बँकिंग क्षेत्रातील गंभीर समस्येचा सखोल शोध घेऊन बँकांना आत्मनिरीक्षण करण्यास ही घटना कारणीभूत ठरू शकते. बँकांवरील अमाप कर्जाचे ओझे, कर्जाची परतफेड होण्यातील अडचणी, शेतकरी आणि सामान्य ग्राहकांतील सतत वाढणारा असंतोष आणि बड्या आणि शक्तिशाली कॉर्पोरेट क्षेत्राला मोठ्या प्रमाणात कर्जे मंजूर करणे, त्यासाठी नियम शिथिल करणे, थकीत कर्जाचे नूतनीकरण करून वसुलीतही सवलती देणे अशा गंभीर कसरती बँकांनी केल्या आहेत. शेतकऱ्यांना किती कर्जमाफी दिली याची माहिती देण्यास मराठे यांच्या अध्यक्षतेखालील राज्य समितीने नकार दर्शविला आहे. माहिती दडपण्याचा आरोप या समितीवर होत आहे. माहिती दडपणे हा कायद्याने गुन्हा आहे. माहिती दडपण्यामागे काही हेतू आहे काय, हा धोरणात्मक निर्णय आहे काय, या सर्व तपशिलाचा बँक संघटनेने सत्वर शोध घ्यावा आणि वास्तव काय आहे हे जाहीर करावे. माहितीचा अधिकार (आरटीआय) कायद्यानुसार सर्व सरकारी विभाग आणि सरकारी प्रायोजित संस्थांची माहिती मागितली जात आहे. मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमे या कायद्याचा माहिती मिळवण्यासाठी वापर करीत आहेत. जी माहिती सहज मिळत नाही अगर नाकारली जाते अशा माहितीसाठी या कायद्याचा उपयोग होत आहे. सार्वजनिक कार्यकर्ते आणि सामाजिक संघटना सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोनातून अधिनियमाखाली सुरक्षित केलेल्या माहितीच्या आधारावर कार्यरत आहेत. अशी माहिती उघड केल्यामुळे काही कार्यकर्त्यांना जीवघेण्या हल्ल्यांचा सामना करावा लागला आहे. अर्थात हा कायदा फक्त दडपलेली माहिती मिळवणे एवढ्यापुरता मर्यादित नाही. सर्व सरकारी आणि

निमशासकीय संस्था यांनी स्वतःहून त्यांचे विहित कर्तव्य म्हणून स्वतःची माहिती उघड करणे ही या कायद्यातील एक महत्त्वाची तरतूद आहे, पण त्याची कार्यवाही गेल्या १२ वर्षांच्या कालावधीतही दुर्लक्षित राहिली आहे व हा कायद्याचा भंग आहे.

माहिती अधिकार कायद्याच्या कलम चारमध्ये प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाला कायद्याच्या अंमलबजावणीपासून १२० दिवसांत आपली सर्व माहिती प्रकाशित करण्याचे आदेश दिले आहेत. सार्वजनिक अगर शासकीय संस्थांचे कार्य आणि कर्तव्ये याप्रमाणे तसेच निरीक्षण आणि उत्तरदायित्वाच्या जबाबदारींसह निर्णय करण्यात वापरलेली प्रक्रिया जाहीर करावयाची आहे. यामध्ये सर्व सरकारी कार्यालये, सरकारी बँका, निमसरकारी संस्था, सरकारच्या सहाय्याने कार्य करीत असलेल्या सहकारी संस्था, नाबार्डसारख्या संस्था, सरकार नियंत्रित म्हाडासारखी महामंडळे, वीज वितरण संस्था, पंचायत समित्या ते जिल्हा परिषदेतील सर्व कार्यालये अशा सर्वांचा समावेश आहे. मागील १२ वर्षांनंतरही कोणत्याही अधिकाऱ्याने या वैधानिक कर्तव्याचे पालन केले नाही. केवळ इंटरनेटवर माहिती दिली आहे असे सांगून कार्यवाही झाली असे म्हणता येणार नाही. कारण या कायद्यात असेही नमूद केलेले आहे की, प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने सतत प्रयत्न करणे आणि कायद्यातील तरतुदीनुसार आवश्यक पावले उचलणे आणि निरनिराळ्या माध्यमांद्वारे नियमित अंतराने जनतेला स्वतःहून (स्युमोटो) माहिती प्रदान करणे आवश्यक आहे. इंटरनेटसह सर्व प्रसारमाध्यमातून जनतेला माहिती मिळण्यासाठी कायद्याचा वापर करण्याचा आहे. सर्व क्षेत्रांतील कोणतीही संस्था या कायदेशीर तरतुदीला प्रतिसाद देत आहे का? उलट नागरिकांना या कायद्यांतर्गत माहिती मागण्याची अपेक्षा केली जाते आणि ही माहिती लगेच मिळेल याची खात्री नसते. लोक सार्वभौम असल्यामुळे त्यांनी निवडून दिलेले मंत्री हे सेवक आणि नियुक्त नोकरशहा हेही सेवक असल्यामुळे नेहमी वापरात येणारी शब्दप्रणाली बदलली पाहिजे.

माहिती अधिकार कायद्यातील अधिनियमानुसार सर्व माध्यम संघटनांच्या सहाय्याने पुढील माहिती देणे बंधनकारक आहे. नियमांची कार्यवाही करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी वापरलेले विशिष्ट नियम व त्यासंबंधीच्या नोंदी, धोरण तयार करण्याच्या किंवा अंमलबजावणीच्या संबंधात जनतेच्या सदस्यांशी सल्लामसलत केली काय किंवा लोकांना प्रतिनिधित्व देऊन केलेली व्यवस्था आणि तपशील, कार्यालयातील फलक, परिषदा, समित्या आणि इतर संस्था यांचे एक सहभाग म्हणून सल्ल्यासाठी किंवा या समित्या व त्याच्या बैठका लोकांना खुल्या आहेत किंवा अशा बैठकीचे नोंदी-पत्रक सार्वजनिक लोकांपर्यंत पोहोचले की नाही याबाबतचे स्पष्टीकरण. अधिकारी आणि कर्मचारी यांची स्पष्ट माहिती, नियमानुसार प्रत्येक कर्मचाऱ्यांना मिळणारे मासिक वेतन.

सार्वजनिक वापरासाठी ठेवले असल्यास ग्रंथालय किंवा वाचन खोलीच्या कामकाजातील माहिती समाविष्ट करण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असलेल्या सुविधांचे तपशील. धोरणे तयार करताना किंवा विरोधी निर्णय करताना सर्व संबंधित कारणांचा तपशील प्रकाशित करण्यासाठी प्रभावित व्यक्तींना प्रशासकीय किंवा अर्धन्यायालयीन निर्णयांसाठी कारणे प्रदान करणे.

प्रत्येक खात्याची माहिती अशा रीतीने प्रसारित केली पाहिजे की, जी सार्वजनिकरीत्या सहज उपलब्ध होईल. 'प्रसारित' करणे याचा अर्थ सूचनापत्रे, वृत्तपत्रे, सार्वजनिक घोषणा, प्रसारमाध्यमे, इत्यादीद्वारे इंटरनेटवरही माहिती देणे. मात्र या गोष्टी योग्यरीत्या कार्यवाहीत येतात काय, हा खरा प्रश्न आहे. कोणत्याही जिल्हाधिकारी किंवा कोणत्याही सार्वजनिक कार्यालयात जा आणि प्रतिसाद काय मिळतो याचा अनुभव घ्या. अशी तपशीलवार माहिती देणारी यंत्रणा नसल्यामुळे हिंदुस्थानच्या संविधानांतर्गत माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन होत आहे. याला जबाबदार कोण आहे आणि कायद्याचे उल्लंघन होत असल्यामुळे कायदेभंगाची कारवाई का होत नाही?

## संपादकीय...

# दुधात साखर!



संपादकः-
दिपक मोरेश्वर नाईक

वाढत्या उत्पादनखर्चामुळे मेटाकुटीस आलेल्या दूध शेतकऱ्याला गायीच्या दुधासाठी सरसकट प्रतिलिटर २५ रुपये देण्याचा निर्णय सरकारने घेतल्याने बळीराजाला मोठा दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेणाऱ्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली विविध शेतकरी संघटनांनी सुरू केलेल्या दूध आंदोलनाची ही गोड फलनिष्पत्ती अनेक अर्थांनी लाभदायी आहे. पावसाळा हा दूधउत्पादकांसाठी मंदीचा (पुष्ट) काळ. अधिक दूध पण मागणी कमी झाल्याने, त्याची झळ शेतकऱ्याला बसते. नेमक्या यावेळीच शेतकरी संघटनेने आंदोलनाचे हत्यार उपसले. नागपूरचे विधिमंडळ अधिवेशन आणि संसदेच्या अधिवेशनाच्या तोंडावर ही दूधकोंडी झाल्याने आंदोलनाकडे नेहमीसारखी डोळेझाक करण्याची संधी सरकारला मिळाली नाही. मुंबईला जाणारे दूध रोखत आर्थिक राजधानीची नाकेबंदी करून सरकारला मागण्या मान्य करायला भाग पाडायचे, अशी संघटनांची रणनीती होती. पश्चिम महाराष्ट्रापासून विदर्भ, मराठवाड्यापर्यंत आंदोलनाची धग तयार झाली. टँकर अडवून, दूध ओतून आंदोलकांनी प्रक्षोभ व्यक्त केला. काही भागात टँकरना आगी लावण्यात आल्या. सरकारने दूधटंचाई टाळण्यासाठी पर्यायी मार्ग अवलंबल्याने पहिल्या दोन दिवसांत फारशी तीव्रता जाणवली नसली तरी तिसऱ्या दिवशी मोठ्या शहरांतून टंचाईचे सावट दिसू लागले. आंदोलन तीव्र करण्याची तयारी सुरू असतानाच व मोठ्या संख्येने शेतकरी पशुधनासह रस्त्यावर उतरल्याने सरकारने नरमाईचे धोरण स्वीकारले. आंदोलन मोडून काढण्यासाठी पोलिस बळ सज्ज ठेवलेल्या सरकारने एक पाऊल मागे घेत नागपुरातच या प्रश्नाचा निकाल लावला. संघटनेच्या मागणीप्रमाणे गायीच्या दुधाला प्रतिलिटर पाच रुपयांची दरवाढ झाली. शेतकरी संघटनांनी त्याचे स्वागत केल्याने एका कळीच्या प्रश्नाचा गोड समारोप झाला. आंदोलन, रस्त्यावर उतरल्याशिवाय हातात काही मिळत नाही, असा सरकारबद्दलचा रोष बळावत होता. समझोत्याशिवाय सत्ताधाऱ्यांसमोर पर्याय नव्हता. आगामी निवडणुकांचे वारे वाहू लागले असताना शेतकऱ्यांचा असंतोष अंगावर घेणे परवडणारे नव्हतेच. यामुळे सबुरीची भूमिका घेतली गेली. पोटनिवडणुकीत मिळालेले शहाणपण यावेळी कामी आले. केंद्र सरकारला सर्वंकष कृषिधोरण राबवण्यात अपयश आले आहे. मात्र, कृषक समाजाला सोबत घेण्याशिवाय गत्यंतर नसल्याची जाणीव झाल्याने आता शेतकरी प्रश्नाची चर्चा होताना दिसते आहे. निवडक पिकांसाठी उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव, उसाला एफआरपीत (वाजवी आणि किफायतशीर दर) प्रतिटन दोनशे रुपयांची वाढ असे महत्त्वाचे निर्णय या पार्श्वभूमीवरच झाले. दुधाचा निर्णयही त्यापैकीच. दूधदरवाढ करताना सरकारने काही अटी घातल्याने मलई लाटणाऱ्या दूधसम्राटांना चाप बसेल. पिशवीबंद दुधासाठी तसेच पावडर उत्पादक संघांना या अनुदानाचा लाभ न देण्याचा निर्णय या धंद्यातील नफेखोरीला आळा घालेल. त्यांना दुहेरी अनुदान लाटता येणार नाही. शेतकऱ्याकडून बारा ते अठरा-वीस रुपयांना दूध खरेदी करायचे आणि ते दुप्पट-अडीचपट दराने विकायचे. उपपदार्थ, मिठायांतून मोठी कमाई करायची, अशा मार्गाने शेतकऱ्याची लूट करणाऱ्या पांढऱ्या बोक्यांना काहीअंशी पायबंद बसेल अशी आशा आहे. अर्थात, यात खासगी आणि सहकारी दूधसंघांची भूमिका महत्त्वाची आहे. शिवाय या लुटीवर सरकारलाही अंकुश ठेवावा लागेल. पहिले आव्हान आहे ते ठरल्यानुसार दर देण्याचे. 'गोकुळ', 'वारणा'सारखे अपवादात्मक सहकारी दूधसंघ लिटरला २३ रुपये दर देत होते. तेरा-चौदा रुपयाने दूध खरेदी करणाऱ्या संघांना आता तब्बल सर्वाधिक अकरा रुपयांची वाढ द्यावी लागेल. ती देण्याची तयारी किमान नागपूरच्या बैठकीत दूधसंघांनी दाखवली असली तरी प्रत्यक्षात काय होते ते पाहावे लागेल. यासाठी शेतकरी संघटनांना प्रसंगी हातात चाबूक घ्यावा लागेल. या पार्श्वभूमीवर दूध आणि दुधाच्या भुकटीवर तब्बल ४० टक्के आयात कर लावत बाहेरून येणाऱ्या दुधाची नाकेबंदी करण्याचे आणि स्वदेशी दूध आणि भुकटीवर २० टक्के प्रोत्साहनपर अनुदान देण्याचे केंद्राचे धोरण पोषक ठरणारे आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी त्याबाबत स्पष्टोक्ती करताना प्राथमिक आणि वनवासी शाळांत विद्यार्थ्यांना माध्यान्ह भोजनात दूध देण्याचे सूतोवाच केले. शेतकरी संघटनांची ही मागणी होतीच. त्याची अंमलबजावणी झाल्यास दूध उत्पादकांना हात मिळेल. केंद्र आणि राज्यातील सरकारने आता एवढ्यावर न थांबता कृषिधोरणांना गती देण्याची आणि ती अधिक पारदर्शी, व्यवहार्य व शेतकरीकेंद्रित बनवण्याची गरज आहे. त्यातही निव्वळ भाषणात अडकलेल्या श्वेतक्रांतीला भक्कम पाठबळ देण्याचे ठोस धोरण घ्यावे लागेल. प्रत्येकवेळी रस्त्यावर उतरावे लागणे आणि कायदा हाती घ्यावे लागणे 'मायबाप' सरकारसाठी निश्चितच भूषणावह नाही!

# दुर्गंधी छुमंतर करणारे 'जीवांमृत'

## वेंगुर्ल्यातील युवकाचे अभूतपूर्व कार्य

### पर्यावरणप्रेमींना सुखद धक्का
### अनेक ठिकाणी यशस्वी प्रयोग

**हो! खरंच आहे हे. तुम्ही विश्वास ठेवा अगर ठेवू नका, पण हे प्रत्यक्ष पाहिलेले अगदी शंभर नंबरी सत्य आहे. वातावरण प्रदूषित करणारी व रोगराई पसरविणारी सार्वजनिक ठिकाणची शौचालये, मुतार्या मलमुक्त, दुर्गंधीमुक्त आणि त्याही पुढे जाऊन अवघ्या काही दिवसांत डासमुक्त देखील करता येणे शक्य होणार आहे. एवढेच कशाला, तर कचरा डेपोची समस्याही कायम स्वरुपी निकाली काढता येणे शक्य आहे. वेंगुर्ले येथील 'अजित परब' या पर्यावरण प्रेमी आर्किटेक्ट युवकाने यशस्वी प्रयोग करून हे सिद्ध करून दाखविले आहे. कृषी ऋषी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'पद्मश्री श्री सुभाष पाळेकर' यांनी जमिनीची सुपिकता वाढविण्यासाठी बनविलेल्या अनोख्या बॅक्टेरियायुक्त जीवामृताच्या सहाय्याने त्याने हा प्रयोग यशस्वी करीत पर्यावरणप्रेमींना सुखद धक्का दिला आहे.**



***जल व वायू प्रदूषणाची वाढती समस्या***

कचरा, जलप्रदूषण आणि वायू प्रदूषण ही समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. जसजशी लोकसंख्या वाढत चालली आहे, तसतशी गावे म्हणा, शहरे म्हणा वा महानगरांमध्ये ही समस्या अतिगंभीर रुप धारण करू लागली आहे. सांडपाणी, विषारी रसायनेयुक्त पाण्यांमुळे तुंबलेली गटारे, नाले, भरून वाहणाऱ्या शौचालयांच्या टाक्या, सार्वजनिक मुतार्यांची दुर्गंधी, दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या कचरा डेपोंची वाढती समस्या यामुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होऊन मानवी जीवन अक्षरश: रोगमय बनून गेले आहे. या समस्येवर उपाय शोधण्याचे प्रयत्न हे सुरुच आहेत. स्वच्छ भारत अभियान, हागंदारी मुक्ती, प्लास्टिक मुक्ती अभियान हे कार्यक्रम हा त्यातलाच एक भाग आहे. पण या अभियानाचे यश हे प्रत्यक्षापेक्षा कागदावरच अधिक प्रभावीपणे रंगवले जाते. वरील प्रकारच्या समस्यांना कायमस्वरुपी मुक्ती देण्यासाठी अधिक परिणामकारक अशा संशोधनाची गरज होती आणि तशा प्रकारचे संशोधन करण्यात वेंगुर्ले येथील 'अजित परब' ह्या पर्यावरणप्रेमी आर्किटेक्ट युवकाने अभूतपूर्व असे यश मिळविले आहे.

***दुर्गंधी, सांडपाणी व कचरा प्रदूषणाचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली***

अजितने जीवामृत नावाचे असावापर केला आहे की जे एकदा का गटारात, नाल्यात वा शौचालयांच्या टाक्यांमध्ये सोडले, की प्रदूषित पाण्यातून निर्माण होणाऱ्या दुर्गंधीची निर्मिती तात्काळ तर थांबणार आहेच. त्याचबरोबर पाण्यातील मलयुक्त घटक, विषारी घटक व प्रदूषणयुक्त घटक हळूहळू नष्ट होऊन शुद्ध झालेले पाणी तात्काळ जमिनीतच मुरणार आहे. एवढेच नव्हे, तर कचरा डेपोंमधील जैविक कचऱ्यावर (प्लास्टिक, काच व धातू सोडून) हे द्रव्य फवारले, तर अवघ्या काही दिवसांत कचऱ्यापासून निर्माण होणारी असहाय्य दुर्गंधी नाहीशी होईल. त्याचबरोबर अवघ्या दोन ते तीन महिन्यांत संपूर्ण कचरा आश्चर्यकारकरीत्या अत्यंत सुपिक अशा मातीत रुपांतरीत होऊन जाईल. अजित परबच्या जीवामृताच्या वापराने हे सिद्ध करून दाखवलंय. सावंतवाडीतील कचरा डेपोवर हा प्रयोग यशस्वी झालाय. तर वेंगुर्ले येथील काही शौचालये, मुताऱ्या शहरातील, बाजारातील सार्वजनिक शौचालये, मुतार्या मच्छीमार्केट तसेच खासगी वसाहत्यांमध्ये हे प्रयोग भलतेच यशस्वी झाले आहेत.

सावंतवाडीतील कचरा डेपोवर हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर नगराध्यक्ष बबन साळगावकर यांनी या युवकाची पाट थोपटून त्याच्यावर आता संपूर्ण सावंतवाडी शहर प्रदूषणमुक्त करण्याची जबाबदारी सोपविण्याचा निर्णय घेतला आहे.

या अनोख्या संशोधनात यश मिळाल्यानंतर अजितने मात्र या जीवांमृताचे श्रेय घेण्यास प्रामाणिकपणे नकार दिला आहे. अजित म्हणाला, जीवांमृत ही कृषीतज्ञ पाळेकरांची निर्मिती आहे. ते या जीवांमृताचा वापर नापिक जमीन पुन्हा सुपिक बनविण्यासाठी करतात. मी थोडा वेगळ्याप्रकारे विचार करून या जीवांमृताचा वापर कचरा, सांडपाणी, मैलामुक्त पाणी आणि दुर्गंधी नष्ट करण्यासाठी करून पाहिला आणि त्यात मला यश मिळाले. या जीवांमृताचा वापर मी थोड्या वेगळ्या प्रकारे केला एवढेच काय ते माझे श्रेय असे मी म्हणेन. माझ्या या संशोधनाचे पेटंट घेण्याचा विचार मी मुळीच केलेला नसून माझे हे संशोधन मी समाजाला अर्पण केले आहे. या संशोधनातून प्रदूषणमुक्ती ही होईलच. त्याचबरोबर जीवांमृत निर्मितीच्या माध्यमातून रोजगार निर्मितीही होऊ शकते, असा दावा अजितने केला. सध्या हे जीवांमृत १० रुपये लिटर या दराने पडत असून भविष्यात निर्मिती वाढली, तर ते कमी देखील होऊ शकते, असे तो म्हणाला.

***काय आहे हे जीवांमृत ?***

जीवांमृत' असे नामकरण करण्यात आलेले हे जीवांमृत गोमुत्र, शेण, गुळ आणि बेसन यांचे एक द्रवरुप मिश्रण आहे. यातून विशिष्ठ प्रकारचे बॅक्टेरिया तयार होतात. जे दुर्गंधी निर्माण करणाऱ्या प्रक्रियेतील बॅक्टेरियांचा नाश करतात. तसेच प्रदूषण पसरवणारी सडण्याची प्रक्रिया बंद करून ते कुजण्याच्या प्रक्रियेला सहाय्य करतात. या कुजण्याच्या प्रक्रियेमुळे मैलामुक्त पाण्यातील मैल्याचे पाण्यातच विघटन होऊन तो नष्ट तर होतोच. त्याचबरोबर त्या पाण्यातील विषारी घटकही नष्ट होऊन शुद्ध झालेले ते पाणी आपोआपच जमिनीत मुरते.

तसेच या पाण्याचा जमिनीलाही काही अपाय होत नाही. उलट जमीन अधीक सुपिक बनते. एवदा का हे जीवांमृत सांडपाण्यात सोडले की मग त्या जीवांमृतातील बॅक्टेरिया प्रचंड वेगाने वाढत जातात. आणखी एक धक्कदायक बाब म्हणजे या जीवांमृताच्या शिडकाव्यामुळे डासांची उत्पत्ती कायमस्वरुपी थांबते. कचर्यावर हे औषध शिडकले, तर कचऱ्याचे तात्काळ मातीत रुपांतर होते. त्यामुळे या जीवांमृतामुळे दुर्गंधीची समस्या कायमस्वरुपी ही संपतेच. त्याचप्रमाणे जलप्रदूषण थांबून रोगराईला आळा बसतो.

# मीरा-भाईंदरमध्ये इलेक्ट्रिक बस धावणार?

***वसई– मुंबईपाठोपाठ आता मीरा-भाईंदरच्या रस्त्यांवर विजेवर चालणाऱ्या बस लवकरच धावताना दिसणार आहेत. मीरा-भाईंदर महापालिकेने केंद्र सरकारच्या अवजड उद्योग मंत्रालयाकडे विजेवर चालणाऱ्या तीस बस खरेदीसाठीच्या निधीची मागणी केली आहे.***




केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी देशात विजेवर चालणाऱ्या बस उपलब्ध करून देण्याची घोषणा केली होती. त्यानंतर मुंबई महानगरपालिकेत काही महिन्यांपूर्वीच या बस दाखल झाल्या आहेत. मुंबईपाठोपाठ नवी मुंबई महानगरपालिकेनेदेखील गेल्या वर्षी विजेवरील बसची मागणी केंद्र सरकारकडे नोंदवली आहे. आता त्यात मीरा-भाईंदर महानगरपालिकादेखील सहभागी झाली आहे. केंद्र सरकारच्या अवजड उद्योग मंत्रालयाचा विद्युत गतिशीलता विभाग राष्ट्रीय अभियानाअंतर्गत 'फास्टर अडॉप्शन अँड मॅन्युफॅक्चरिंग ऑफ इलेक्ट्रिक व्हेईकल इन इंडिया' (फेम) या योजनेद्वारे देशात विविध शहरांतील परिवहन व्यवस्था सुधारण्यासाठी अनुदान देत असतो. मीरा-भाईदर महानगरपालिकाही स्वत:च्या परिवहन सेवेची गाडी रुळावर आणण्यासाठी उत्सुक आहे. विजेवर चालणाऱ्या बसमुळे कार्बनडाय ऑक्साइड वायूचे उत्सर्जन कमी होऊन पर्यावरण रक्षणाचे काम केले जाते. झपाट्याने वाढणाऱ्या मीरा-भाईंदर शहरातील पर्यावरण दिवसेंदिवस ढळू लागले आहे. विजेवर चालणाऱ्या बस सुरू केल्यास त्यात सुधारणा होण्यास मदत होणार आहे. या उद्देशाने महापालिकेने मध्यम आकाराच्या ३० बससाठी निधी देण्याची मागणी केंद्र सरकारकडे केली आहे. नवी मुंबईसोबतच मीरा-भाईंदर महापालिकेचा प्रस्तावही केंद्र सरकारकडून लवकरच मान्य होण्याची शक्यता आहे.

महापालिकेच्या ताफ्यात सध्या ५८ बस असून त्यातील सुमारे ३८ बस विविध मार्गावर धावत आहेत. या बससाठी दर महिन्याला डिझेलवर सुमारे ७० लाख रुपये खर्च होत असतो. विजेवर चालणाऱ्या बस आल्यानंतर डिझेलवर होणाऱ्या खर्चाची बचत होणार आहे. डिझेलवर चालणाऱ्या एका बससाठी प्रति किलोमीटर साधारणपणे ३४ रुपये इतका खर्च येत असतो. हाच खर्च विजेवर चालणाऱ्या बससाठी प्रति किमी १६ रुपये इतका येतो. एक बस दिवसाकाठी २०० किमी धावत असल्याने विजेच्या बससाठी दरदिवशी सुमारे साडेतीन हजार रुपयांची बचत होणार आहे. त्यामुळे परिवहन सेवेचा होणारा बराचसा तोटा भरून निघणार आहे.

# ठाण्यात बॉलीवूड उद्यान घोटाळा?

**ठाणे-** ठाणे येथील लोकमान्यनगर भागात उद्यानासाठी जागा आरक्षित नसतानाही त्या ठिकाणी बॉलीवूड उद्यानाच्या उभारणीसाठी २० कोटी रुपयांच्या कामाचा ठेका काढण्यात आल्याची बाब शुक्रवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत उघड झाली. विशेष म्हणजे या ठिकाणी अजून काहीच काम झालेले नसतानाही संबंधित ठेकेदाराला सहा कोटी रुपयांचे बिल देण्यात आल्याची बाब पुढे आली आहे. यावर सर्वपक्षीय नगरसेवकांनी नाराजी व्यक्त केल्याने महापौर मीनाक्षी शिंदे यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत.



ठाणे येथील लोकमान्यनगर भागात बॉलीवूड उद्यानाची उभारणी करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयानुसार पालिका प्रशासनाने तयार केलेल्या प्रस्तावास २० फेबुवारी २०१४ मध्ये सर्वसाधारण सभेने मान्यता दिली होती. परंतु या उद्यानातील साहित्य तयार करण्याचे काम कर्जतमध्ये सुरू असल्याचे सांगितले जात आहे. परंतु या ठिकाणी अजूनही काहीच काम झालेले नसतानाही संबंधित ठेकेदाराला सहा कोटी रुपयांचे बिल देण्यात आल्याचा मुद्दा शिवसेना नगरसेविका आशा डोंगरे यांनी उपस्थित केला. ज्या ठिकाणी हे उद्यान प्रस्तावित असल्याचे सांगितले जात आहे, ती जागा दारू पिणाऱ्यांचा अड्डा बनल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

हाच धागा पकडून उद्यानासाठी जागा आरक्षित नसतानाही त्या ठिकाणी बॉलीवूड पार्क उभारणीसाठी निविदा कशा काढण्यात आल्या, असा मुद्दा भाजप नगरसेवक मिलिंद पाटणकर यांनी उपस्थित केला. बॉलीवूड उद्यान उभारण्यात येत असलेली जागा अंतर्गत वाहतुकीसाठी आरक्षित आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने चुकीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे सादर करून लोकप्रतिनिधींची दिशाभूल केल्याचा आरोप राष्ट्रवादीचे नगरसेवक हणमंत जगदाळे यांनी केला आहे.

बॉलीवूड उद्यानाचे साहित्य स्टुडिओमध्ये तयार करावे लागत असल्यामुळे कर्जत येथे साहित्य तयार करण्याचे काम सुरू आहे. या कामाची संबंधित अधिकाऱ्यांनी पाहणी करून एकूण बिलाच्या रकमेपैकी सहा कोटी रुपयांचे बिल दिल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त समीर उन्हाळे यांनी दिली.

# पालघरमधील अस्वाली धरणात पर्यटकांचा उच्छाद



**पालघर–** पालघरमधील अस्वाली धरणात अविवेकी पर्यटकांनी धुडघूस घातला आहे. त्यांच्यावर तत्काळ कारवाई न झाल्यास जीवितहानी होण्याची शक्यता आहे. मात्र प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याने स्थानिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

शासनाच्या ग्रामविकास आणि जलसंधारण विभागाअंतर्गत पश्चिम घाटाच्या सानिध्यात असलेले हे धरण बोर्डी या पर्यटन स्थळानजीकच्या अस्वाली गावात आहे. हा भाग सीमेवर असल्याने लगतच्या गुजरात राज्यातील तरुणाई येथे मोठ्या प्रमाणात येते. मद्यपान करून अनेक जण पाण्यात पोहण्यासाठी उतरतात. तसेच परिसरात मद्याच्या बाटल्या आणि सोबत आणलेल्या खाद्यपदार्थांचा कचराही फेकला जातो. त्यामुळे पश्चिम घाटाचा हा निसर्गरम्य परिसर अस्वच्छ होत चालला आहे. त्याचा त्रास स्थानिक आदिवासी आणि अन्य पर्यटकांना होतो.

जिल्ह्यातील पंधरा धबधब्यांवर पर्यटकांना जाण्यासाठी तीन महिन्याकरीता मनाई आदेश लागू आहे. तसेच काही ठिकाणी सुरक्षारक्षक तैनात आहेत. त्यामुळे त्यामध्ये अस्वाली धरणाचाही समावेश करावा अशी मागणी आता नागरिकांनी केली आहे.

# विक्रीसाठी आणलेल्या नवजात बालकाची सुटका; चौघांना अटक

**नवी मुंबई–** अपहरण करून आणलेल्या १० दिवसाच्या बालकाची विक्री होण्यापूर्वीच पोलिसांनी त्याची सुखरूप सुटका केली आहे. याप्रकरणी चौघांना अटक करण्यात आली असून त्यात दोघा महिलांचा समावेश आहे. परंतु हे बालक त्यांनी कुठून आणले याचा अद्याप उलगडा झालेला नाही. कोपर खैरणे रेल्वेस्थानकाबाहेर ठाणे बेलापूर मार्गावर नवजात बालकाच्या विक्रीचा व्यवहार होणार असल्याची माहिती खंडणी विरोधी पथकाला मिळाली होती.



त्यानुसार उपायुक्त तुषार दोषी, सहायक आयुक्त अजय कदम यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक शिरीष पवार, सहायक निरीक्षक विजय चव्हाण, उपनिरीक्षक योगेश वाघमारे, सहायक उपनिरीक्षक शेखर तायडे, मनोहर चव्हाण यांचे पथक तयार करण्यात आले होते. त्यांनी शुक्रवारी रात्री ७ वाजण्याच्या सुमारास कोपर खैरणे स्थानकाबाहेर सापळा रचला होता. यावेळी एका नवजात बालकासह त्याठिकाणी आलेल्या चौघांची चौकशी करण्यात आली. चौकशीत त्यांच्यापासून समाधानकारक खुलासा न झाल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले होते. यावेळी त्यांनी त्यांच्याकडील सुमारे १० ते १५ दिवसाच्या बालकाच्या विक्रीसाठी ते त्याठिकाणी आले होते याचीही त्यांनी कबुली दिली. माजीद अब्दुल माजिद शेख (२७), रईस हजरत काझी (२६), नगीना बेगम युसूफ खान (२८) व मंजुषा तिलक खाटोडा (२३) अशी त्यांची नावे आहेत. चौघेही मुंब्रा व मुंबई परिसरात राहणारे आहेत. तीन लाख रुपयांना त्यांच्याकडील बालक संबंधिताला विकणार होते. तत्पूर्वीच पोलिसांनी त्यांच्यावर कारवाई करून नवजात बालकाची सुखरूप सुटका केली. मात्र त्यांनी हे नवजात बालक कुठून अपहरण करून आणले याची माहिती अद्याप दिलेली नाही. त्याप्रकरणी खंडणी विरोधी पथक अधिक तपास करत आहेत.

# वसई किल्ल्याचे पावित्र्य संकटात

**नालासोपारा- पोर्तूगीजांच्या जुलमी अत्याचारापासून वसईकरांची मक्तता करुन रयतेला आश्वस्त करणाऱ्या नरवीर चिमाजी आप्पाच्या येथील स्मारकाचे पावित्र्य संकटात आले आहे. मराठा साम्राज्याचे चिन्ह असणा-या या किल्ल्यामध्ये येथे येणारे हौशी पर्यटक, प्रेमी युगुले, दारुडे व प्रि-वेडिंग कपल्सच्या धिंगाण्यामुळे दुर्ग प्रेमींनी संताप व्यक्त केला आहे.**

हा जंजिरा महाराष्ट्रातील दुर्गमित्रांसाठी व वसईकरांसाठी अभिमानाचे प्रतिक आहे. या स्मारकाचा वसई विरार महानगरपालिका अंतर्गत वेळोवेळी विविध माध्यमातून सुशोभिकरणाचा प्रयत्न सुरू असतो. वसईतील पोर्तुगीजांची जुलमी सत्ता उलथवून टिकण्यासाठी नरवीर चिमाजी आप्पांनी वसईवर आक्र मण केले. वसईचा रणसंग्राम व मिळवलेला विजय हा हजारो मराठ्यांच्या रक्ताने लिहीला गेला आहे. त्यामूळे इतिहासात त्याला मानाचे स्थान आहे. या गोष्टीला आता तीन शतके उलटली आहेत.

मात्र, या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना स्मारकाचे महत्व सांगणारा व स्पष्ट नियमावली सांगणारा एकही फलक नसल्याने सध्या येथे स्वैर कारभार सुरू आहे. त्यात किल्ल्यातील इतर भागापेक्षा स्मारक परिसर स्वच्छ असल्याने प्रेमीयुगले व दारु बाजांना हे ठिकाण आयते मिळाले आहे. याला पायबंद घालण्यासाठी वसई- विरार महानगरपालिकेने या स्मारकाचे महत्त्व लक्षात घेऊन या ठिकाणी कायमस्वरूपी व योग्य गणवेश, ओळखपत्र असणारी व्यक्ती नियुक्त करणे अत्यंत गरजेचे असल्याचे दुर्गप्रेमींकडून सांगण्यात येत आहे.

शेकडो एकर परिसर असलेल्या या भूईकोट किल्ल्यात सद्या प्रि-वेडिंग छायाचित्रे नावाने सुरू असणारी नवी संस्कृती ऐतिहासिक स्थळांचे पावित्र्य नष्ट करण्यासाठी पुढे सरसावत आहे. येथील स्मारक रोज सकाळी स्थानिक मंडळींच्या व्यायामासाठी व योग साधनेसाठी उपयोगात येते. सध्या स्मारकात यासाठी कोणतीच व्यवस्था नाही. स्मारकातील काही भागात दुर्गमित्रांच्या अभ्यासिकेची व्यवस्था, बालगोपाल वर्ग उद्यान, ढोल ताशा पथकाच्या सरावाची व सरावाच्या साधनांची व्यवस्था, मोडीपत्रे भाषांतरे, वसई मोहिमेतील नरवीरांच्या स्मृती जपणारी पूजनीय स्मारकशिळा



किंवा स्मृतीस्तंभ, जंजिरे वसई किल्ल्याची प्रतिकृती, जंजिरे वसई किल्ल्याची थोडक्यात माहिती, स्मारकाची स्वच्छता व संरक्षण करणारे सुरक्षारक्षक, स्मारकास भेट देण्यास वेळेचे योग्य बंधन, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शौचालय व्यवस्था इत्यादी सोप्या लहान स्वरूपाच्या उपक्र मांनी नरवीर चिमाजी स्मारक प्रत्येकास हवेहवेसे आपलेसे वाटेल.

# आहाराची बिले थकली, वसतीगृह बंद?

*डहाणू- डहाणू एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतगर्त पालघर जिल्हयात चालविल्या जाणाऱ्या निवासी शासकीय वसतीगृहांसाठी गेल्या तीन महिन्यापासून जव्हार प्रकल्प कार्यालय तसेच आदिवासी अप्पर आयुक्त कार्यालय ठाणे येथून निधी वितरित होण्यास प्रचंड विलंब होत असल्याने वसतीगृहात दररोज पोषण आहार पुरविणा-या महिला बचतगट तसेच इतर ठेकेदार कमालीचे आर्थिक अडचणीत सापडले आहेत. प्रकल्प कार्यालय डहाणू येथे वारंवार हेलपाटे मारूनही आहाराची बीले दिली जात नसल्याने येत्या आठ दिवसांत भोजन ठेक्याची बीले मंजूर न केल्यास आहाराचा पुरवठा बंद करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे.*

शासनाने आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याची सोय केली आहे. डहाणू प्रकल्प कार्यालयाअंतर्गत वसई, पालघर, तलासरी, डहाणू असे चार तालुके येत असून त्यात शासनामार्फत एकूण ३४ आश्रमशाळा तसेच १७ निवासी वसतीगृहे चालविली जातात. या मध्ये सुमारे वीस हजार आदिवासी मुले-मुली राहून शहरातील विविध शाळा, महाविद्यालयात शिक्षण घेत असतात. त्यांना दररोज दुध, केळी, अंडी, शिरा, उपमा, चिकन तसेच दोन वेळचे पोटभर जेवण महिला बचत गटामार्फत दिले जाते. दरमहा प्रकल्प कार्यालयाद्वारे पोषण आहार पुरवठा करणाऱ्या ठेकेदारांची बीले अदा केली जातात.

परंतु राज्यात शाळा महाविद्यालय, आश्रमशाळा निवासी वसतीगृह सुरू होऊन एक महिना झाला तरी अद्याप भोजन ठेकेदारांना गेल्या मार्च, एप्रिल तसेच या वर्षाच्या जून महिन्याची आहार बील प्रकल्प कार्यालयाने अदा न केल्याने महिला बचतगट आर्थिक अडचणीत सापडले आहेत. मात्र आदिवासी विकास प्रकल्प डहाणू येथे स्वतंत्र अधिकारी नसल्याने त्यांचे हाल झाले आहेत. याबाबत चौकशी केली असता ठाणे अप्पर आयुक्त तसेच जव्हार प्रकल्प कार्यालय येथून डहाणू प्रकल्पाला दिला जाणारा निधी अद्यापही न दिल्याने बीले अदा करता आलेली नाही असे उत्तर मिळाले.

डहाणू आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाचे प्रकल्प अधिकारी तसेच सहाय्यक जिल्हाधिकारी आंचल गोयल यांची मे महिन्यात रत्नगीरी येथे बदली झाल्यानंतर डहाणू कार्यालयात कोणत्याही स्वतंत्र अधिकाऱ्याची नियुक्ती झालेली नाही. सध्या डहाणू प्रकल्पाचा कार्यभर जव्हार




प्रकल्प कार्यालयाला सोपवण्यात आला आहे. तेथील प्रकल्प अधिकारी अजित कुंभारे हे आठवडयातून किमान एक दिवस डहाणू कार्यालयात येत आहे. त्यांच्याकडे दोन्ही प्रकल्पाचा कार्यभार असल्याने त्यांनी ही तारेवरची कसरत करावी लागत आहे. याबाबत डहाणूचे आमदार पास्कल धानारे यांना विचारले असता दोन, चार दिवसांत डहाणूसाठी स्वतंत्र प्रकल्प अधिकारी येईल, असे सागितले होते. एक महिना झाला तरी अद्याप डहाणू अधिकारी न मिळाल्याने आश्चर्य व्यक्त केले जाते आहे.

# २०१९ मध्ये राज्यात भगवा फडकणार – संजय राऊत

**मुंबई-** राज्यात २०१९ च्या विधानसभा निवडणूकीत शिवसेनेचीच सत्ता येईल आणि उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतील असा विश्वास शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी व्यक्त केला. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री व्हावेत हा आम्ही शिवसैनिकांचा हट्ट आहे असेही ते म्हणाले. मात्र भाजपाला आपण अजूनही मोठा भाऊ मानतो, पण आधी ठरल्याप्रमाणे भाजपा केंद्रात मोठा असून राज्यात शिवसेना आहे.

मोदी सरकारविरोधातील पहिला अविश्वास ठराव लोकसभात पडला. ४५१ सदस्यांनी मतदानात सहभाग घेतला होता. मात्र बीजेडी आणि शिवसेनेने मतदानाला गैरहजेरी लावली होती. शिवसेनेचा अविश्वास ठरावात सहभाग न घेण्याचा निर्णय योग्यच होता असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे योग्य वेळी योग्य निर्णय घेतात आणि आम्ही त्याचे पालन करतो. लोकसभेत अविश्वास ठरावात जे चित्रं दिसलं ते आगामी निवडणूकीत उलटं असेल असा दावा राऊत यांनी यावेळी केला. सत्ताधारी पक्षाला



बहुमत मिळवणं ही फार मोठी गोष्ट नव्हती. बहुमत विकत घेतलं जातं असा आरोपही त्यांनी यावेळी केला. संसदेत चांगल्या विरोधकांचीही अतिशय गरज असते. ते काम राहुल गांधी अतिशय चांगल्या पद्धतीने करत असल्याने ते योग्य विरोधक असल्याचे सांगत राऊत यांनी राहुल गांधी यांचे कौतुक केले. शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या सामनामधील भावा जिंकलस या मथळ्याखाली संसदेतील राहुल गांधींच्या भाषणाचे कौतुक करण्यात आले आहे. याशिवाय भाजपा आणि शिवसेना यांच्यातील राजकीय संबंधांविषयीही त्यांनी काही महत्त्वाची वक्तव्ये केली. भाजपाला इतर राज्यात विविध पक्षांकडून मिळणारा पाठिंबा हा त्या पक्षांची मजबुरी असते असेही ते म्हणाले.

# कोर्ट मॅरेजसाठी जाणाऱ्या मुलीला वडिल आणि भावाने जिवंत जाळले

**भोपाल-** कोर्ट मॅरेज करण्यासाठी एक मुलगी घरातून बाहेर पडली, त्यावेळी तिच्या वडिलांनी आणि भावाने तिला जिवंत जाळल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. दुसऱ्या जातीच्या मुलाशी लग्न करायला चालली म्हणून या मुलीला जिवंत जाळण्यात आले.



भाजपशासित मध्यप्रदेशात ही धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेत या मुलीचा जागीच मृत्यू झाला. मध्यप्रदेशातील भोपाळपासून २५० किमी अंतरावर असलेल्या खंडवा जिल्ह्यात ही अंगावर काटे आणणरी घटना घडल्याचे समजते आहे. या प्रकरणी या मुलीचे वडिल सुरेंद्रलाल यादव आणि भाऊ राजेंद्र यादव या दोघांनाही अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ज्या मुलीला जिवंत जाळण्यात आले तिचे एका मुलावर गेल्या काही महिन्यांपासून प्रेम जडले होते. ही गोष्ट जेव्हा मुलीच्या घरातल्यांना समजली तेव्हा त्यांनी या गोष्टीला विरोध केला. मात्र मुलीने हा विरोध झुगारून लावत लग्न करेन तर याच मुलाशी अशी ठाम भूमिका घेतली. तसेच दोघांनी कोर्टात जाऊन लग्न करण्याचाही निर्णय घेतला. त्यानंतर आधी ठरल्याप्रमाणे जेव्हा ही मुलगी कोर्ट मॅरेज करण्यासाठी बाहेर पडली तेव्हा तिच्या वडिलांनी आणि भावाने तिला जिवंत जाळले. या घटनेत या मुलीचा जागीच मृत्यू झाला.

# शंभरच्या नव्या नोटेमुळे तब्बल १०० कोटींचा फटका

**नवी दिल्ली-** भारतीय चलनात लवकरच १०० रुपयांची नवी नोट येणार असल्याचे भारतीय रिझर्व्ह बँकेकडून सांगण्यात आले. या नव्या १०० रुपयांच्या नोटेचा फोटोही जारी करण्यात आले आहे. परंतु ही नवी नोट जुन्या नोटेपेक्षा आकाराने वेगळी आहे. यामुळे एटीएम रिकॅलिब्रेट करावी लागणार आहेत. यासाठी १०० कोटींचा खर्च होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.



काही दिवसांपूर्वीच आरबीआयने २०० रुपयाची नोट चलनात आणली होती. त्याचा आकारही नेहमींच्या नोटेपेक्षा वेगळा असल्याने त्यावेळीही एटीएमचे रिकॅलिब्रेट करण्यात आले होते. त्याचे काम अद्यापही पूर्ण झालेले नाही. तरीही आरबीआयने १०० रुपयाची नवी नोट बाजारात आणण्याची घोषणा केली आहे. दरम्यान एकदाच रिकॅलिब्रेशन न करता नेहमीनेहमी शिल्लकचा भूर्दंड कशाला असा प्रश्न सोशल मीडियातून विचारण्यात येत आहे.

# ‘भाजपा हटाओ, देश बचाओ’ मोहिम सुरु करणार ममता बॅनर्जींची गर्जना

**कोलकाता-** भाजपा हटाओ देश बचाओ या मोहिमेला १५ ऑगस्टपासून सुरुवात करणार असल्याची घोषणा पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकांचे रणशिंगच या घोषणेद्वारे ममता बॅनर्जी यांनी फुंकले आहे अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. तृणमूल काँग्रेसचा वार्षिक शहीद दिवस असल्याने आयोजित करण्यात आलेल्या रॅलीत त्या बोलत होत्या. एकीकडे ममता बॅनर्जी यांनी ही घोषणा केली असतानाच तिकडे भाजपालाही एक मोठा धक्का बसला. कारण भाजपाचे नेते चंदन मित्रा यांनी आज भाजपाला जय श्रीराम करत टीएमसीमध्ये प्रवेश केला.

१५ ऑगस्टपासून आपण भाजपा हटाओ देश बचाओ या मोहिमेला सुरूवात करणार आहोत. २०१९ च्या निवडणुका लक्षात घेऊन या मोहिमेच्या रूपातून एक मोठा प्रहार भाजपावर करायचा आहे असेही ममता बॅनर्जी यांनी म्हटले आहे. भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघात



काही चांगली माणसे आहेत मी त्यांचा आदर करते. मात्र काही जणांकडून अत्यंत गलिच्छ राजकारण करणे सुरू आहे असेही ममता बॅनर्जींनी म्हटले आहे. देशभरातून मॉब लिंचिंग अर्थात जमावाकडून मारहाणीच्या घटना समोर येत आहेत. यातून लोकांमध्ये तालिबानी निर्माण करायचे आहेत का? असा प्रश्नही ममता बॅनर्जींनी विचारला. एवढेच नाही तर आगामी लोकसभा निवडणुकांमध्ये तृणमूल काँग्रेसला ४२ जागांवर विजय मिळेल असाही विश्वास ममता बॅनर्जींनी व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पश्चिम बंगालच्या मिदनापूर दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांनी काही समाज विघातक समूहाच्या हाती पश्चिम बंगालचा कारभार दिला गेला आहे लोक त्यांच्या दहशतीत आहेत असा आरोप केला होता. या आरोपांना ममता बॅनर्जींनी उत्तर दिले. लोक इतके दहशतीत आहेत की बंगालमध्ये पूजा करणेही कठीण होऊ बसले आहे अशी टीकाही मोदींनी केली होती. मात्र पंतप्रधान बंगालच्या लोकांची दिशाभूल करत होते असे म्हणत ममता बॅनर्जींनी भाजपा हटाओ देश बचाओ मोहिमेचा नारा दिला.

# तुकाराम मुंढेंचा धाडसी निर्णय, सत्ताधारी भाजपला दिला झटका



**नाशिक–** विविध कारणांमुळं सतत चर्चेत असणारे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या धडाकेबाज कार्यपद्धतीचा फटका आता नाशिक महापालिकेतील सत्ताधारी भाजपला बसला आहे. प्रस्तावित करवाढ रद्द करण्याचा महापालिका सभेचा ठराव मुंढे यांनी बेकायदेशीर ठरवला आहे. महापालिकेनं अधिकाराच्या बाहेर जाऊन हा निर्णय घेतला असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

ते पत्रकार परिषदेत बोलत होते. ‘नाशिक महापालिकेचं उत्पन्न आणि खर्चात मोठी तफावत आहे. गेल्या आर्थिक वर्षात पालिकेला करांद्वारे केवळ १२ ते १३ टक्के उत्पन्न मिळालंय. शहराचा विकास करायचा असेल तर पैसा लागतो. त्यामुळं करवाढ आवश्यक आहे,’ असं त्यांनी सांगितलं. ‘करवाढीच्या प्रस्तावावर महासभेत १० तास चर्चा झाली. पण मला बोलू दिलं गेलं नाही. करवाढीचा प्रस्ताव महासभा कायद्यानं रद्द करूच शकत नाही. महासभा केवळ करांचे दर ठरवू शकते, मात्र रेटेबल व्हॅल्यू ठरवण्याचा अधिकार माझा आहे,’ असं त्यांनी ठणकावलं.

# अमेरिकेत करोडो डॉलर्सचा घोटाळा, २० भारतीयांना कारावासाची शिक्षा

**न्यूयॉर्क- अमेरिकेत करोडो डॉलर्सच्या कॉल सेंटर घोटाळ्यात सहभागी असलेल्या भारतीय वंशाच्या २० जणांना २० वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. भारतात स्थित असलेल्या कॉल सेंटरच्या माध्यमातून हजारो अमेरिकन नागरिकांना करोडो डॉलर्सचा गंडा घालण्यात आला होता. या आठवड्यात ज्या २१ जणांना दोषी ठरवण्यात आलं आहे त्यांना चार ते २० वर्षांपर्यंतची शिक्षा सुनावण्यात आली आहे.**

शिक्षा पूर्ण झाल्यानंतर अनेकांना पुन्हा भारतात पाठवलं जाईल. अमेरिकेतील ॲटर्नी जनरल जेफ सेशन्स यांनी हा निर्णय मोठा विजय असल्याचं म्हटलं आहे.

अमेरिकन अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, कॉल सेंटर घोटाळ्याच्या माध्यमातून हजारो नागरिकांची करोडो डॉलर्सची फसवणूक करण्यात आली.



भारतात स्थित असलेल्या कॉल सेंटरमधून खोट्या स्कीमची माहिती देत फोन करण्यात आले आणि हजारो अमेरिकन नागरिकांना गंडवण्यात आलं. पीडितांमध्ये खासकरुन वयस्कर आणि पर्यटकांचा समावेश आहे. अहमदाबादमध्ये असणाऱ्या कॉल सेंटरमधून अमेरिकन नागरिकांना फोन करुन आपण अमेरिकेच्या इंटरनल रेव्हेन्यू सर्व्हिसमधून बोलत असल्याचा बनाव करत आर्थित घोटाळा करण्यात आला. डेटा ब्रोकर्सकडून मिळवण्यात आलेल्या माहितीच्या आधारे अमेरिकन नागरिकांना फोन करुन पैसे न भरल्यास अटक करण्याची तसंच दंड, अमेरिकेतून बाहेर काढण्याची धमकी देण्यात आली. पीडित त्यांच्या जाळ्यात अडकले आणि मागितले तेवढे पैसे दिले. याआधी तीन भारतीयांना याच अफरातफरी प्रकरणात शिक्षा सुनावण्या आली आहे.

# अमानुषपणाचा कळस...नोकरीचे आमिष दाखवून ४० पुरुषांनी केला तरुणीवर बलात्कार

**चंदीगड-** आपल्यावर ४० पुरुषांनी सलग चार दिवस बलात्कार केल्याची तक्रार एका २२ वर्षीय तरुणीने केली आहे. ही घटना हरयाणामधील पंचकुला जिल्ह्यात मोरनी येथे घडली. पोलिसांनी याप्रकरणी तीन जणांना अटक केली आहे.

चंदीगड येथील मनीमाजरा पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दाखल झाली आहे. या महिलेचा आरोप आहे की तिला चार दिवस डांबून ठेवण्यात आले होते, तिथे या पुरुषांनी तिच्यावर आळीपाळीने बलात्कार केला.

या महिलेच्या पतीने सांगितले की, ‘आमच्या एका ओळखीतल्या इसमाने तिला गेस्ट हाऊसमध्ये ११ ते १२ हजार रुपये महिना पगाराची स्वीपरची नोकरी देण्याचे आमिष दाखवले. तिला गुंगीचे औषध दिले आणि चार दिवस तिच्यावर बलात्कार केला. घडल्या प्रकाराची कुठे वाच्यता न करण्याची धमकी दिली.’

पंचकुला पोलिसांनी या प्रकरणाचा तपास करण्यासाठी विशेष तपास पथक स्थापन केले आहे. ही घटना वरिष्ठांना न कळवल्याने तसेच महिलेच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केल्याच्या कारणावरून एका महिलेसह दोन सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि एका कॉन्स्टेबलला निलंबित करण्यात आलं आहे.

गेस्ट हाऊसच्या मालकाला



आणि व्यवस्थापकाला अटक करण्यात आली आहे.

‘दररोज सुमारे १० पुरुषांनी तिच्यावर बलात्कार केला. हा प्रकार १५ ते १८ जुलैपर्यंत सुरू होता. तिने कसाबसा मला फोन केला आणि घडला प्रकार सांगितला.

------------------------(पृष्ठ १ वरुन)------------------------

# सेव्हन इलेव्हन रुग्णालयाची जागा अखेर महापालिकेकडे

इतके क्षेत्र महापालिकेला बांधून मोफत हस्तांतर करायचे होते, परंतु रुग्णालय सुरु होऊन चार ते पाच वर्षे उलटल्यानंतरही महापालिकेकडे जागा हस्तांतर झाली नव्हती. महापालिकेने जागा हस्तांतर करण्याबाबत वारंवार नोटीसा बजावूनदेखील रुग्णालय व्यवस्थापनाकडून वेळकाढूपणाचे धोरण अवलंबले जात होते.

महापालिकेची हक्काची जागा महापालिकेला मिळत नसल्याने जिद्धी मराठा संघटना व संस्थापक प्रदीप जंगम यांनी वेगवेगळ्या पद्धतीने आंदोलने केली. सतत ४ दिवस लक्षणीक उपोषण करुन प्रशासनाला जेरीस आणले व प्रशासनाला आमदाराने गिळंकृत करण्याचा प्रयत्न केलेले रुग्णालय नागरिकांना मिळवून देण्यासाठी अथक प्रयत्न केले. त्यावेळी कोणत्याही धमकीला न घाबरता माजी नगरसेवक मिलन म्हात्रे यांनी ही या आंदोलनात भाग घेऊन लोकायुक्तांकडे तक्रार दाखल केली होती. या पार्श्वभुमीवर आयुक्त बालाजी खतगावकर यांनी प्रत्यक्ष रुग्णालयात जाऊन महापालिकेला हस्तांतर करण्याच्या जागेला भेट दिली होती. त्या वेळी रुग्णालय व्यवस्थापनाला ही जागा तातडीने हस्तांतर करण्याचे आदेश त्यांनी दिले होते. लोकायुक्तांकडे झालेल्या ४ जुलैच्या सुनावणीतही जागा तातडीने हस्तांतर करुन घेण्यात येइल, अशी भुमिका महापालिकेकडून मांडण्यात आली होती. त्यानुसार जागा हस्तांतरणाबाबतचा सेव्हन इलेव्हन कंपनी आणि महापालिका यांच्यात करारनामा झाला असून त्याची




नोंदणीदेखील करण्यात आली असल्याची माहिती आयुक्तांनी झालेल्या महासभेत सदस्यांना दिली. जागेची साफसफाई करण्याचे काम सध्या सुरु असून त्यानंतर त्याजागी महापालिकेचे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्यात येणार आहे.

# मिठी मारणं बालिशपणा; भाजपनं उडवली खिल्ली

**नवी दिल्ली-** लोकसभेत अविश्वास ठरावावरील चर्चेवेळी पंतप्रधानांना मिठी मारण्याचा प्रकार बालिशपणाचा होता, अशा शब्दांत भारतीय जनता पक्षाने काँग्रेसचे अध्यक्ष राहुल गांधी यांची खिल्ली उडवली आहे. या चर्चेवेळी राहुल यांनी केलेले भाषण विनोदी होते, त्यात ठोस मुद्दाच नव्हता, असेही पक्षाने म्हटले आहे.

राहुल यांच्या भाषणावर प्रतिक्रिया देताना भाजपचे राष्ट्री प्रवक्ते संबित पात्रा म्हणाले, ‘राहुल यांच्या भाषणात मुद्दे कमी होते, ते भाषण विनोदीच जास्त होते. जनतेचे लक्ष गुरुवारपासून राहुल यांच्याकडे लागले होते. ते भाषणात काय म्हणतात ते लोकांना ऐकायचे होते. मी



बोललो तर भूकंप होईल, असे ते गेल्या वेळी म्हणाले होते. त्यामुळे आम्ही १५ मिनिटे वाट पाहिली, अर्धा तास वाट पाहिली, तासभर वाट पाहिली, पण राहुल यांच्या भाषणात मुद्दाच नसल्यामुळे काहीच घडले नाही.’

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपमुळे आपल्याला हिंदू आणि हिदुस्थानी म्हणजे काय ते समजले, या विधानाविषयीही पात्रा यांनी या विधानाबाबतही नाराजी व्यक्त केली.




## आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट

आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट व सेव्हन हिल्स हॉस्पिटल अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमानाने समाजातील व गरीब लोकांसाठी किडनी, कॅन्सर, हृदयरोग, ब्रेन आदी रोगांवर नि:शुल्क शस्त्रक्रिया करुन देण्यात येईल. केवळ केसरी आणि पिवळे रेशनकार्डधारक असणाऱ्यांनाच या सेवेचा लाभ मिळेल.

संस्थापकः- श्री. दीपक मोरेश्वर नाईक, मो. ८४२४९८९८९८

email:deepakmnaik@gmail.com, manavadhikar@gmail.com, www.ashraytrust.com

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)